ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – II, Issue – V February 2014

# डी. टी. एड., बी. एड. आणि एम. एड. च्या विद्यार्थी शिक्षकांमधील स्व संकल्पनेचा तौलनिक अभ्यास

प्रा. डॉ. सौ. पुष्पा जी. पाटील,
सहायक प्राध्यापक,
आदिवासी सेवा सहाय्यक शिक्षण प्रसारक संस्थेचे,
श्री. सुरूपसिंग हिऱ्या नाईक शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
नवापूर, जि. नंदूरबार

**प्रस्तावना –**

स्वतःच स्वतःची ओळख करून घेणे स्वतः बद्दलची जाणीव करून घेणे म्हणजे स्व–संकल्पना होय. व्यक्तिच्या स्वतः बद्दलच्या काही कल्पना, भावना असतात, तसेच विश्वास आणि मुल्ये असतात. या सर्वांचा स्व–संकल्पनेत समावेश असतो. स्व–संकल्पनेतूनच व्यक्तिमत्वाची जडणघडण होत असते. यातुनच व्यक्तिला स्वतःची ओळख होते. आपण कोण आहोत? याची जाणीव होते. कोऽहम् ? हा प्रश्न व्यक्ती स्वतःला विचारत असते. त्यामुळे सामाजिक संबंध सुधारण्यासाठी स्व–संकल्पना हातभार लावते. स्व–संकल्पनेमुळे व्यक्तिच्या जीवनाला स्वयं दिशा प्राप्त होते.

स्व–संकल्पनेत व्यक्तिच्या शारिरीक, मानसिक व सामाजिक स्व–प्रतिमांचा समावेश होतो. शारिरीक स्व–प्रतिमेत व्यक्तिची शरीरयष्टी, सौंदर्य इ. गोष्टी समाविष्ट होतात. मानसिक स्व–संकल्पनेत व्यक्तिच्या भावना, गुणवैशिष्ट्ये, मर्यादा, समायोजन क्षमता इ. चा समावेश होतो. यामध्ये माझ्यात काय गुण आहेत आणि काय दोष आहेत हे स्वतः समजुन घेणे शक्य होते. शारिरीक व मानसिक स्व–संकल्पनेतून सामाजिक स्व–संकल्पना तयार होत जाते ही संकल्पना तयार होण्यासाठी समाजातील व्यक्ति हातभार लावत असतात. उदा. लोक मला काय समजतात? लोक मला काय म्हणतील ?माझा कसा विचार करतात? या भावनेतून ही स्व संकल्पना विकसित होत जाते. या गोष्टीमुळेही व्यक्तिला समाजामान्यता व लोकप्रियता मिळते.

विद्यार्थ्यांमध्ये स्व संकल्पना विकसित होण्यासाठी पालक, शिक्षक व समवयस्क मित्र हातभार लावत असतात. आई–वडील नातेवाईक याचा 'स्व' प्रतिमेवर मोठा परिणाम होतो. तसेच विद्यार्थी जसा घरी आई–वडीलांच्या सानिध्यात असतो तसा शाळेत शिक्षक व समवयस्क मित्र यांच्या सानिध्यात असतो. यातुनच स्व संकल्पनेचे संस्कार विद्यार्थ्यांवर होत असतात. व त्यानुसार त्यांची स्व संकल्पना विकसित

होत जाते. शिक्षकाची स्व संकल्पना जर चांगली असेल तर तो विद्यार्थ्यांमध्ये या संकल्पनेचा विकास करू शकेल.यासाठी शिक्षकास स्व संकल्पनांची जाणीव असायला हवी. हा दृष्टिकोन ठेवून डी. टी. एड., बी. एड. आणि एम. एड. च्या विद्यार्थी शिक्षकांना याची जाणीव असायला हवी. म्हणून डी. टी. एड., बी. एड. आणि एम. एड. च्या विद्यार्थी शिक्षकांच्या स्व संकल्पनेत फरक आढळतो का? हे जाणून घेण्यासाठी सदर संशोधन करण्यात आले.

**गरज –**

आज अनेक विद्यार्थ्यांना स्वतःची ओळख नसते. त्यामुळे स्वतःला न ओळखता स्वतःची कमतरता, बलस्थाने न ओळखता महत्वाचे निर्णय त्यांच्याकडून घेतले जातात. काही वेळेला ते चूकण्याची देखिल शक्यता असते. असे होऊ नये यासाठी अगोदर स्वतः बद्दल काय वाटते. याची जाणीव त्यांना होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे कोणीतरी आपले कौतुक करावे ही नैसर्गिक प्रेरणा बालवयातुनच मिळते याच प्रेरणेतुन स्वतःचा उदय होतो. स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांना निराश मनःस्थितीत किंवा वैफल्यग्रस्त स्थितीला सामोरे जावे लागते. यामागील कारण काय? तर स्वतःच्या जीवन आणि शिक्षणासंदर्भात निराशा किंवा नकारात्मक दृष्टीकोन दिसून येतो.

शिक्षणशास्त्र महाविद्यालयीन स्तरावरील विद्यार्थी शिक्षकांचा वयोगट हा भावनात्मक अविष्काराला वळण लावण्याचा दृष्टीने महत्वपूर्ण समजला जातो. नैसर्गिक प्रेरणा, भावना, क्षमता व गरजा इ. क्रिया स्वतःच ओळखण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे काळाची गरज आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे –**

1. डी. टी. एड., बी. एड. आणि एम. एड. च्या विद्यार्थी शिक्षकांमधील स्व संकल्पनेचा शोध घेणे
2. डी. टी. एड. आणि बी. एड. च्या विद्यार्थी शिक्षकांमधील स्व संकल्पनेचा तुलनात्मक अभ्यास करणे.
3. बी. एड. आणि एम. एड. च्या विद्यार्थी शिक्षकांमधील स्व संकल्पनेचा तुलनात्मक अभ्यास करणे.
4. डी. टी. एड. आणि एम. एड. च्या विद्यार्थी शिक्षकांमधील स्व संकल्पनेचा तुलनात्मक अभ्यास करणे.

**शुन्य परिकल्पना –**

1. डी. टी. एड. आणि बी. एड. च्या विद्यार्थी शिक्षकांमधील स्व संकल्पनेत सार्थ फरक आढळत नाही.
2. बी. एड. आणि एम. एड. च्या विद्यार्थी शिक्षकांमधील संकल्पनेत सार्थ फरक आढळत नाही.
3. डी. टी. एड. आणि एम. एड. च्या विद्यार्थी शिक्षकांमधील संकल्पनेत सार्थ फरक आढळत नाही.

ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – II, Issue – V February 2014

**पारिभाषिक शब्दांची कार्यात्मक व्याख्या –**

**स्व संकल्पना :**

स्व मध्ये संकलित झालेल्या सर्व गोष्टींची जाणीव व त्यावर आधारीत अशी व्यक्तीची स्वतः विषयीची कल्पना म्हणजेच स्व–संकल्पना होय.

डॉ. राजकुमार सारस्वत यांनी प्रमाणित केलेल्या स्व संकल्पना मापन चाचणीद्वारे मिळवलेले गुण म्हणजे विद्यार्थी शिक्षकांची स्व संकल्पना निदर्शक गुणांक होत.

**बी. एड. विद्यार्थी शिक्षक :**

"कोणत्याही शाखेची पदवी उत्तीर्ण झाल्यानंतर शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थी शिक्षक

**डी. टी. एड. विद्यार्थी शिक्षक :**

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर प्राथमिक शिक्षण देण्यासाठी आवश्यक असलेले शिक्षणशास्त्रातील दोन वर्षाचा पदविका अभ्यासक्रम अभ्यासण्यासाठी प्रवेशित विद्यार्थी शिक्षक

**एम. एड विद्यार्थी शिक्षक :**

बी. एड. उत्तीर्ण झाल्यानंतर पदव्युत्तर अभ्यासक्रम अभ्यासण्यासाठी शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थी शिक्षक

**तौलनिक अभ्यास :**

नवापूर शहरातील डी. टी. एड., बी. एड. आणि एम. एड. च्या विद्यार्थी शिक्षकांमधील स्व संकल्पनेचा तुलनात्मक अभ्यास

**जनसंख्या –**

नवापूर शहरातील डी. टी. एड. ( 300 विद्यार्थी ), बी. एड..(300 विद्यार्थी ) आणि एम. एड. (35 विद्यार्थी ) मिळून 635 विद्यार्थी शिक्षक जनसंख्या होय.

**न्यादर्श –**

संभाव्यता पध्दतीतील सुगम यादृच्छिक पध्दतीने ( 30 डी. टी. एड. विद्यार्थी + 30 बी. एड. विद्यार्थी + 30 एम. एड. विद्यार्थी ) एकूण 90 विद्यार्थी शिक्षक न्यादर्श होय.

ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – II, Issue – V February 2014

**संशोधन साधन –**

डॉ. राजकुमार के. सारस्वत यांनी प्रमाणित केलेली स्व संकल्पना प्रश्नावली. या प्रश्नावलीत 48 विधाने आहेत. पंचबिंदूस्तरीय प्रश्नावली असून विश्वसनियता 0.91 व सप्रमाणता 0.80 इतकी आहे. या प्रश्नावलीत शारिरीक, सामाजिक स्वाभाविक, शैक्षणिक, नैतिक व बौध्दिक अशा 6 बाबींवर आधारीत प्रत्येकी 8 प्रश्न विचारलेले आहेत.

**संख्याशास्त्रीय तंत्रे –** मध्यमान, प्रमाण विचलन, *t* मुल्य या सांख्यिकीय तंत्राचा वापर केला.

**संशोधन कार्यवाही –**

डी. टी. एड., बी. एड. आणि एम. एड. च्या विद्यार्थी शिक्षकांकडून एकाच वेळेस प्रमाणित स्व संकल्पना मापन चाचणी भरून घेण्यात आली. या चाचणीद्वारे प्राप्त झालेल्या माहितीचे विश्लेषण, संख्याशास्त्रीय तंत्राचा वापर करून अर्थनिर्वचन करण्यात आले. व त्यावरून निष्कर्ष काढण्यात आले.

**संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन –**

**उद्दिष्ट –**

डी. टी. एड. आणि बी. एड. च्या विद्यार्थी शिक्षकांमधील स्व संकल्पनेचा तुलनात्मक अभ्यास करणे.

**सारणी क्र. 1**

डी. टी. एड. आणि बी. एड. च्या विद्यार्थी शिक्षकांमधील स्व संकल्पनेची तुलना दर्शविणारी सारणी

| अभ्यास गट | संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | t- मूल्य | प्राप्त t ची सार्थकता |
|---|---|---|---|---|---|
| डी. टी. एड. | 30 | 17.9 | 2.72 | 4.53 | सार्थक |
| बी. एड. | 30 | 27.55 | 3.11 | | |

**निरीक्षण –**

डी. टी. एड. आणि बी. एड. च्या विद्यार्थी शिक्षकांमधील स्व संकल्पनेत फरक आढळतो.

**अर्थनिर्वचन –**

सारणी क्र. 1 तील डी. टी. एड. आणि बी. एड. च्या विद्यार्थी शिक्षकांमधील स्व संकल्पनेचे प्राप्त t- मूल्य (4.53) 0.05 स्तरावर स्वाधीनता मात्रा 58 करिता नमुना t- मूल्य (1.67) पेक्षा जास्त आहे. परिणामतः शुन्य परिकल्पना त्यागावी लागेल.

**उद्दिष्ट –**

बी. एड. आणि एम. एड. च्या विद्यार्थी शिक्षकांमधील स्व संकल्पनेचा तुलनात्मक अभ्यास करणे.

ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – II, Issue – V February 2014

**सारणी क्र. 2**

बी. एड. आणि एम. एड. च्या विद्यार्थी शिक्षकांमधील स्व संकल्पनेची तुलना दर्शविणारी सारणी

| अभ्यास गट | संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | t- मूल्य | प्राप्त tची सार्थकता |
|---|---|---|---|---|---|
| बी. एड. | 30 | 27.55 | 3.11 | 2.95 | सार्थक |
| एम. एड. | 30 | 37.27 | 5.21 | | |

**निरीक्षण –**

बी. एड. आणि एम. एड. च्या विद्यार्थी शिक्षकांमधील स्व संकल्पनेत फरक आढळतो.

**अर्थनिर्वचन –**

सारणी क्र. 1 तील बी. एड. आणि एम. एड. च्या विद्यार्थी शिक्षकांमधील स्व संकल्पनेचे प्राप्त t- मूल्य (2.95) 0.05 स्तरावर स्वाधीनता मात्रा 58 करिता नमुना t- मूल्य (1.67) पेक्षा जास्त आहे. परिणामतः शुन्य परिकल्पना त्यागावी लागेल.

**उद्दिष्ट –**

डी. टी. एड. आणि एम. एड. च्या विद्यार्थी शिक्षकांमधील स्व संकल्पनेचा तुलनात्मक अभ्यास करणे.

**सारणी क्र. 3**

डी. टी. एड. आणि एम. एड. च्या विद्यार्थी शिक्षकांमधील स्व संकल्पनेची तुलना दर्शविणारी सारणी

| अभ्यास गट | संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | t- मूल्य | प्राप्त t ची सार्थकता |
|---|---|---|---|---|---|
| डी. टी. एड. | 30 | 17.9 | 2.72 | 12.21 | सार्थक |
| एम. एड. | 30 | 37.27 | 5.21 | | |

**निरीक्षण –**

डी. टी. एड. आणि एम. एड. च्या विद्यार्थी शिक्षकांमधील स्व संकल्पनेत फरक आढळतो.

**अर्थनिर्वचन –**

सारणी क्र. 3 तील डी. टी. एड. आणि एम. एड. च्या विद्यार्थी शिक्षकांमधील स्व संकल्पनेचे प्राप्त t- मूल्य (12.21) 0.05 स्तरावर स्वाधीनता मात्रा 58 करिता नमुना t- मूल्य (1.67) पेक्षा जास्त आहे. परिणामतः शुन्य परिकल्पना त्यागावी लागेल.

**निष्कर्ष –**

1. डी. टी. एड. विद्यार्थी शिक्षकांपेक्षा बी. एड. च्या विद्यार्थी शिक्षकांमधील स्व संकल्पनेचे प्रमाण जास्त आढळते.
2. बी. एड. विद्यार्थी शिक्षकांपेक्षा एम. एड. च्या विद्यार्थी शिक्षकांमधील स्व संकल्पनेचे प्रमाण जास्त आढळते.
3. डी. टी. एड. विद्यार्थी शिक्षकांपेक्षा एम. एड. च्या विद्यार्थी शिक्षकांमधील स्व संकल्पनेचे प्रमाण खुप जास्त आढळते.

एकंदरीत असे लक्षात येते की, जसजसं वय आणि अनुभव वाढत जातात तसतसं स्व संकल्पना विकसित होत जातात.

**संदर्भ सूची –**

1. भितांडे, वि. रा. (1989). *शैक्षणिक संशोधन पध्दती.* पुणेः नुतन प्रकाशन.
2. जगताप, ह. ना. (1990). *शैक्षणिक प्रायोगिक मानसशास्त्र..* पुणेः नुतन प्रकाशन.
3. पारसनीस,न. रा. (1990). *प्रगत शैक्षणिक मानसशास्त्र..* पुणेः नुतन प्रकाशन.
4. पंडीत, ब. बि. ( 2005). *शिक्षणातील संशोधन.* पुणेः नित्य नुतन प्रकाशन.
5. दांडेकर, वा. ना. (1988). *शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र.* पुणेः मोघे प्रकाशन.